नि.दि.दावा क्र. १२/२०२४

तुकाराम वि. ज्ञानोबा व इतर

**<u>निशाणी क्र. ३५ खालील आदेशः-</u>**

प्रस्तूत अर्ज हा प्रतिवादी क्रं ४ ते ९ यांनी त्यांच्याविरुध्द परीत करण्यात आलेला विना जबाब दावा चा आदेश रददबातल करुण मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यावर वादीने प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्रं ४ ते ९ यांच्या विद्वान विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, काही महत्वाची कागदपत्र वेळेत उपलब्ध झाले नाहीत. प्रतिवादींनी जबाब दावा दाखल करण्यासाठी जाणिवपूर्वक विलंब केलेला नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द विना जबाब दावा आदेश पारीत झाला. प्रतिवादी विरुध्द झालेला विना जबाब दावा आदेश रद्द करावा अशी विनंती केली.

३. वादीच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्रं ४ ते ९ यांनी जबाब दावा दाखल करण्यास ९० दिवसाचा विलंब केला आहे. त्यांना पुरेसा वेळ मिळाला असतानाही त्यांनी मुदतीत त्यांचे म्हणणे सादर केले नाही. म्हणून सदरचा अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

४. दोन्ही बाजूंचे म्हणणे पाहिले. वादी यांनी प्रस्तुत दावा हा प्रतिवादी यांच्या विरुध्द वाटणी होऊन स्वतंत्र ताबा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत वाद मिळकतीमध्ये प्रतिवादी क्रं ४ ते ९ यांचे महत्वाचे हक्क व हितसंबध गुंतलेले आहेत. तसेच प्रतिवादी क्रं ४ ते ९ यांनाही बचावावाची संधी देणे हे न्याय गरजेचे आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार प्रत्येक दाव्यात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकारांचे म्हणणे दाखल होणे व त्यांची योग्य बाजू मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे प्रतिवादी क्र. ४ ते ९ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश,

**आदेश**

१. प्रतिवादी क्रं ४ ते ९ यांचा नि.क्रं.३५ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ४ ते ९ यांच्या विरुध्द पारीत करण्यात आलेला विना जबाब दावा आदेश रददबातल प्रतिवादी क्रं ४ ते ९ यांच्या वर रुपये २००/– दंड बसवुन माफ करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र. ४ ते ९ यांनी दंड रक्कम वादी यांना द्यावी.

स्वाक्षरीत/–

रेणापूर (के.के.वाघमारे)

दिनांकः– २८/०३/२०२५ सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर., रेणापूर